ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 7 | August - 2016

Indian Streams Research Journal

# यशवंतराव चव्हाणांचे सहकार विषयक विचार व कार्य

ज्ञानदेव शिवनाथ नागवे
इतिहास विभाग, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.



**प्रस्तावना-**

महाराष्ट्राच्या जडणघडणीचे एक शिल्पकार, कर्तव्यदक्ष प्रशासक, चतुर राजकारणी, साहित्याचे सहृदय रसिक, संवेदनक्षम माणुसप्रेमी, एक निरलस ज्ञानपिपासु आणि कुटुंबजनातील सुखदु:खात सहवेदनेने रंगणारा, अशा विविध पैलुंनी यशवंतराव चव्हाणांचे व्यक्तीमत्व संपन्नपने नटलेले होते.

महाराष्ट्राने अनेक पुरुष पाहिले खरे म्हणजे निर्माण केलेत, त्यापैकी यशवंतराव चव्हाण हे एक होते. व्दिभाषिक राज्याचे मुख्यमंत्री, स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री, भारत राष्ट्राच्या कठीण प्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरु या हिमालयाच्या हाकेला ओ देणारे (सह्याद्री) संरक्षणमंत्री आणि विशाल दृष्टी असलेला एक धुरंधर महापुरुष, यशवंतराव चव्हाणांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकिय विचार प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत या दृष्टीने त्यांचे आर्थिक विचार कृषी-औद्योगिक समाजरचनेच्या माध्यमातून सहकार विषयक विचारही महत्वपूर्ण आहे.

**उद्दिष्टे -**

महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाणांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक व विकासाच्या बरोबरीनेच मुख्यत्वे कृषी – औद्योगिक समाजरचनेच्या माध्यमातून सहकार विषयक योगदान अभ्यासणे.

**गृहितके -**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेबरोबरच यशवंतराव चव्हाणांनी येथील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक या बरोबरीनेच सहकार क्षेत्राच्या विकासात मौलिक भूमिका निभावलेली आहे.

**सहकाराचा अर्थ -**

सहकार (Co-operation) या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील "Co-operate" या शब्दापासून झालेली असल्याचे आढळुन येते. सहकार या इंग्रजी शब्दाचा अर्थ Co म्हणजे सह आणि operation म्हणजे क्रिया. म्हणजेच Co-operate या शब्दाचा अर्थ सामान्य उद्दिष्टांच्या पुर्तीसाठी "**एकत्र** येऊन कार्य **करणे**" असा होतो.[१] प्राचीन काळातील संत-महात्म्यांनी सहकाराची महती कथन केलेली आहे असे असले तरी आधुनिक सहकार चळवळ ही इंग्लंडमधील १८ व्या शतकातील औद्योगीक क्रांतीमुळे उदयास आली असे मानले जाते.[२]

भारतात सहकाराचा पहिला कायदा इ.स. १९०४ मध्ये संमत करण्यात आला. इ.स. १९१२, १९१९, १९२५ या वर्षात वेगवेगळे कायदे संमत करुन पहिल्या कायद्यातील दोष काढुन टाकण्यात आले. ग्रामीण पतसर्वेक्षण समिती (१९५४), वैकुंठ भाई मेहता समिती (१९६०) यांच्या अहवालात व पंचवार्षिक योजनांच्या मसुद्यात सहकाराचा सतत पुरस्कार केल्याचे दिसून येते. यातही यशवंतरावांचे महत्त्वाचे योगदान असल्याचे दिसते.

यशवंतराव चव्हाणांचे सहकार विषयक विचार व कार्य याचा ऊहापोह सदरील प्रमाणे करता येईल.

**१.कृषी प्रधानता -**

भारत हा खेड्यांचा देश आहे. येथील मुख्य व्यवसाय शेती आहे आणि भारतीय अर्थव्यवस्था या आधारेच कृषी अर्थव्यवस्था आहे. यास्तव लोकशाही समाजवादी निष्ठा ही यशवंतराव चव्हाणांच्या भूमिकेत प्रबळ असल्याने या दृष्टीनेच ते महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जडणघडणीचा विचार करत. शेती व शेतकरी यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय त्यांनी बाळगले होते. हाच त्यांच्या चिंतनाचा विषय होता. केवळ शेती उत्पादनातून शेतक-यांचा सर्वांगिण विकास साध्य होणार नाही. यासाठी शेतीला पुरक असे उद्योग महाराष्ट्रात निर्माण झाले पाहिजेत. कृषी हा ग्रामविकासाचा गाभा आहे म्हणून या भोवतीच छोट्या उद्योगांची इमारत उभी राहिली पाहिजेत. हे त्यांच्या कृषी-औद्योगिक समाजरचनेचे प्रमुख सुत्र होते. खेड्यातील कृषी उद्योग उभे राहिल्यास खेडेही खेडे राहत नाही तर खेडे व शहर यातील अंतर कमी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान निर्माण करणारी साधने शेतक-यापर्यंत पोहोचली पाहिजेत. अशा पध्दतीने अस्तित्वात आलेली कृषी – औद्योगीक समाजरचना औद्योगिकीकरणावर अवलंबुन असल्यामुळे जसजसे औद्योगिकीकरण वाढत जाईल तसतशी कृषी अर्थव्यवस्था अस्तीत्वात येईल.[३] यातील औद्योगिक वाढीसाठी त्यांनी सहकाराची जोड दिल्याचे दिसते.

**२.ग्रामविकास कृषीपुरक उद्योगांची जोड -**

यशवंतराव चव्हाणांना ग्रामीण कृषी क्षेत्राचा विकासासाठी कृषीपुरक उद्योगधंद्याची जोड अपेक्षित होती. यासाठी त्यांनी ग्रामीण भागात कृषी मालावर प्रक्रिया करणारे उद्योग सुरु करण्याच्या भुमिकेवर भर दिला. यातून शेतक-यांना मालाची बाजारपेठ उपलब्ध होईल, उद्योगासाठी कच्चा माल प्राप्त होईल आणि मुख्य म्हणजे यामुळे तेथील लोकांना रोजगार मिळेल. यामागे खेड्यातील माणुस हा स्वतःच्या श्रमाचा मालक झाला पाहिजे हे त्यांचे प्रमुख सुत्र होते. राजकीय व सामाजिक जीवनात कार्य करणा-या कार्यकर्त्याला विविध संस्थाचा पायाभूत आधार असला पाहिजे यावर श्रद्धा असल्याने त्यांनी कृषी औद्योगिक समाजरचनेचे [४] नवे प्रतिमान महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जडणघडणीसाठी पर्यायाने सहकारी संस्थेचे जाळे निर्माण करुन ग्रामीण आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला.

**३.सहकारातून समाजवादी समाजरचना –**

यशवंतरावांच्या मते सहकारी चळवळीमुळे समाजवादी समाजरचना निर्माण होते. याचे स्पष्टीकरण देतांना ते म्हणतात, शेतक-यांना उद्योगधंद्यात पैसे गुंतविण्यास लावण्याचा सहकार हाच एक मार्ग आहे. सहकारामुळेच ग्रामीण व शहरी मुल्यातील अंतर नष्ट होते. यामुळे या दोन्ही पातळीवरील लोक एकत्र येतात. सहकारी संघटनेमुळे वाढलेले उत्पन्न शक्य तितक्या जास्त क्षेत्रात वाटले जाते.

**४.सहकार सत्तेचे केंद्र -**

सहकार चळवळीत आर्थिक सत्ता आहे याचीही जाणीव लोकांत आणि त्याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्यांत निर्माण झाली आहे. ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे केंद्र आहे आणि सत्तेचे केंद्र म्हटले म्हणजे लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजेत तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल अशी मला साधार भिती वाटते.[५] असेही विचार ते व्यक्त करतात.

**५.विठ्ठलराव विखे पाटील यांना सहकार्य –**

यशवंतराव चव्हाण परिस्थितीने दिल्लीच्या राजकारणात स्थिरावले होते तरी महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांची पकड कायम होती. त्यांनी ग्रामीण नेतृत्वाला महाराष्ट्राच्या राजकारणात स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न केला. साम्यान्यांचे हित हे राजकारणाचे ध्येय मानणारी माणसे त्यांनी राजकारणात आणली.[६] याच दृष्टीने पाहिल्यास सहकारधुरीण म्हणून पुढे ओळखले गेलेले पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सारख्या विधायक क्षेत्रात कार्य करणा-या नेत्याला सहकार्य केले. त्यांनी सहकार चळवळीचा झेंडा रोवला आणि महाराष्ट्रात सहकार चळवळ फोफावली.

**६.सहकार लोकशाही चळवळ -**

यशवंतरावाच्या मते, सहकारी चळवळीकडे एका पक्षाची चळवळ म्हणून न पाहता तिच्याकडे लोकशाही चळवळ म्हणून पाहिली जावी. लोकशाहीचे हे रुप डागाळणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. सामान्य आणि शोषित समाजाच्या उपयोगी पडणे हा या चळवळीचा प्राण आहे. म्हणून ख-या अर्थाने ही चळवळ चालवायची असेल तर आपण याकडे लोकशाही दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे, असे यशवंतरावांना वाटते.

सहकाराला चालना देण्याच्या हेतूने व ग्रामीण जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकुलत्व साधण्यासाठी त्यांनी शेतीसाठी कर्जपुरवठा करणे, शेतीमालाची विक्री करणे, शेतीसाठी व घरगुती उद्योगासाठी लागणा-या वस्तुंची विक्री, शेतमालावर प्रक्रिया, दुग्ध उत्पादकांच्या संघटना बांधने अशी विविधांगी कामे यशवंतराव यांच्या काळात शासनाने केली. गृहनिर्माण संस्थाना चालना दिल्याने सहकार चळवळ खेड्यापासून शहरापर्यत आली. यशवंतरावांच्याच काळात ग्रामीण कर्जपुरवठ्याच्या सोयीकरता सहकारी बँक, भूविकास बँका, प्राथमिक भुविकास बँकाची निर्मिती झाली. सन १९५७ मध्ये यशवंतरावांच्या काळात सरकारने राज्यामध्ये १८ सहकारी साखरकारखान्यांची नोंद करुन देशामध्ये अग्रेसरत्व प्राप्त केले. शिवाय या कारखान्यांना भाग भांडवलाची सोय करुन दिली. आज सहकारी साखर कारखान्याच्या बाबतीत देशामध्ये महाराष्ट्राला जो अग्रेसरत्वाचा मान मिळाला आहे त्याचे श्रेय यशवंतरावांच्या तत्कालीन धोरणांना द्यावे लागते.

**७.सहकारातून विकास -**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण भारताच्या आधुनिकीकरणावर भर दिला. त्यांनी कृषी-औद्योगिक समाजाची संकल्पना मांडून सहकार चळवळीला उत्तेजन दिले. कारण सहकारातूनच समाजवाद विकसीत करता येईल.[७] म्हणून महाराष्ट्रात सहकार तत्वावर शंभराहुन अधिक साखर कारखाने उभे राहिले. सुतगिरण्या, सहकारी तेल उद्योग, सहकारी हातमाग, सहकारी बँका, दुध संघ अशा सहकारी संस्थाच्या माध्यमातून कृषीचा, औद्योगिक क्षेत्राचा विकास घडवून आणण्यावर भर दिला आणि योजना आखल्या व अंमलात आणल्या यशवंतरावांच्या मते सहकार हा भांडवलशाहीचा उतारा ठरु शकतो.

अशा पध्दतीने मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासावर भर दिला, सहकारी चळवळीचे महत्व जाणून त्यांनी महाराष्ट्रात सहकार क्षेत्राचा पाया पक्का केला. शेतकरी वर्गाच्या कल्याणासाठी त्यांनी नवं कृषी-धोरण अंगीकारलं होतं, 'कसेल त्याची जमीन' या सारखा प्रगत विचारांचा कायदा केला आणि महाराष्ट्राला साखर निर्मितीच्या क्षेत्रात अग्रेसर बनवलं. याशिवाय महाराष्ट्राची पंचवार्षिक योजना सुरु करण्याचा उपक्रम केला.[८] यातून त्यांच्या जमीनींशी असलेल्या नात्याच्या बरोबरीनेच सहकाराची गरज व जाण लक्षात येते.

**निष्कर्ष -**

महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या जडणघडणीत यशवंतराव चव्हाणांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासाच्या बरोबरीनेच ग्रामीण विकास, कृषी औद्योगीक समाजरचना यामध्ये सहकाराच्या माध्यमातून महत्वाचे योगदान राहिल्याचे दिसते. यासाठी राजकीय सत्तेत असतांना सहकार विषयक कायदे करण्यात ही त्यांनी आपले योगदान दिलेले आहे.

**संदर्भ-**
१.गंगाधर कांयदे पाटील- सहकार चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्रथमअ ावृत्ती, २००६ पृ-३.३
२.कित्ता - पृ३ – .१
३.महाराष्ट्राच्या विकासात यशवंतराव चव्हाणांची भूमिका व कार्य, मुख्य संपादक - डॉ.अ शोक खैरनार,अ थर्व पब्लिकेशन, धुळे, प्रथमावृत्ती -२०१३ .पृ१७६–.
४.कित्ता – पृ-१७७.
५.यशोधन -) यशवंतराव चव्हाणा यांचे निवडक विचार (संकलन - विनायक पाटीलअ ा. पहिली - जानेवारी २०१५ द्वराजहंस प्रकाशन, पुणे.
६.म. वि. य. चव्हाणांची भु. व कार्य -उ परोक्त, पृ-१६०.
७.म. वि. य. चव्हाणांची भु .व कार्य -उ परोक्त, पृ-२२ .
८.यशवंराव ते विलासराव –डॉ. विश्वास मेहेंदळे,अ नुबंध, प्रका, पुणे, द्वि.अ ावृत्ती,२००७, पृ-८१,८२.
९.प्रा. घाटोळे रा.ना- समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपुर.



**ज्ञानदेव शिवनाथ नागवे**
**इतिहास विभाग, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना.**